## ठामपा-फोटो सर्कल छायाचित्र प्रदर्शन

# ठाणे सांस्कृतिक वारसा जपणारं शहर - देसाई

◆ **प्रतिनिधी / ठाणे**

**दि. २६ - ठाणे सांस्कृतिक वारसा जपणारं शहर आहे, असं मत प्रसिद्ध कला दिग्दर्शक नितीन देसाई यांनी केलं.**

ठाणे महापालिका आणि फोटो सर्कल यांच्या संयुक्त विद्यमाने छायाचित्र प्रदर्शनाचं आणि स्पर्धेचं आयोजन करण्यात आलंय. या प्रदर्शनाचं उद्घाटन नितीन देसाई यांच्या हस्ते झालं.

देसाई पुढे म्हणाले की, फोटो सर्कल सोसायटीमध्ये जागतिक किर्तीचे छायाचित्रकार निर्माण करण्याची कुवत आहे.

प्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी महापौर शारदा राऊत, इतिहासकार हरिभाऊ शेजवळ आदी उपस्थित होते. या छायाचित्र प्रदर्शन स्पर्धेचा निकाल जाहीर झाला असून तो पुढीलप्रमाणे आहे.


'ज्येष्ठ नागरिक' या विषयावरील पराग शिंदे यांचं पहिलं पारितोषिकप्राप्त छायाचित्र

व्यावसायिक गटात पराग शिंदे यांनी पहिलं पारितोषिक पटकावलंय तर जयवंत नाईक हे दुसऱ्या पारितोषिकाचे मानकरी ठरलेत. तृतीय पारितोषिक प्रितेश राव आणि उत्तेजनार्थ पारितोषिक गजानन दुधलकर, विनय पाटील यांना मिळालंय.

हौशी गटामध्ये 'निसर्ग छायाचित्र' या विषयावर विजय वाघमारे यांनी पहिलं पारितोषिक मिळवलंय तर विद्याधर सिद्धये यांनी द्वितीय

(पान २ वर ⇨)